● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ४३ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

yuva.aadarsh@gmail.com RNI: MAHMAR/2019/78282

# युवा आदर्श

https://www.facebook.com/yuvaaadarshnews/

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो. ८३९००९८८८६ सोमवार, दि २ सप्टेंबर २०२४ https://yuvaadarsh.com

## स्वच्छतेसाठी नागरिकांची ओरड!

महापालिकेने घेतले बहिऱ्याचे सोंग? जिल्हाधिकारी लक्ष देतील?





**जालना । प्रतिनिधी -** शहरातील कालीकुर्ती परिसरात होत असलेले डम्पिंग ग्राऊंड-कचरा हटविण्याची मागणी गेल्या महिनाभरापासून परिसरातील नागरिक करत आहेत. मात्र याकडे जालना शहर महानगर पालिकेचे स्वच्छता विभागाने अद्यापही लक्ष दिले नाही. परिणामी परिसरात दुर्गंधी पसरली असून मोठा आजार पसरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या गंभीर बाबीकडे जिल्हा प्रशासनाने लक्ष्य देण्याची मागणी होत आहे.

कालीकुर्ती भागात अस्वच्छता पसरली असून येथील नागरिक गेल्या महिनाभरापासून येथील कचरा उचलण्यासाठी महानगर पालिकेकडे मागणी करत आहेत. स्वातंत्र्यदिनापुर्वी परिसरातील सामाजिक कार्यकर्ते अ‍ॅड. महेश धन्नावत यांनी परिसरातील स्वच्छता करण्यासंदर्भात महानगर पालिकेचे आयुक्त व जिल्हा प्रशासनाला निवेदनही दिले होते. त्यानंतरही स्वच्छता झाली नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हर घर तिरंगा मोहिमेतंर्गत या भागातील घरावर तिरंगा ध्वज फडकवता आला नाही. राष्ट्रध्वजाचा अवमान होऊ नये याची काळजी परिसरातील नागरिकांनी घेतली. या बाबतही अ‍ॅड. धन्नावत यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती. यासही जवळपास दोन आठवड्यांचा अवधी उलटून गेला आहे. अद्यापही महानगर पालिकेच्या स्वच्छता विभागाला जाग आली नाही. पुढे गणेशोत्सव असून या काळात तरी या भागात स्वच्छता व्हावी अशी रास्त अपेक्षा या भागातील नागरिकांकडून होत आहे. स्वच्छतेची ओरड करणाऱ्या कालीकुर्ती भागातील नागरिकांचा आवाज बहिरेपणाचे सोंग घेणाऱ्या महानगर पालिकेच्या स्वच्छता विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कानापर्यंत पोहचेल की नाही हे सांगता येणार नसले तरी या गंभीर विषयाकडे जिल्हाधिकारी यांनी स्वतः लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

श्री महावीर स्थानकवासी जैन इंग्लिश स्कुल बंद करण्याचा संस्थाचालकांचा निर्णय!

# मराठवाडा शिक्षक संघाने काढली शाळा बचाव रॅली

**जालना । प्रतिनिधी -** शाळा बंद करण्याच्या संस्थाचालकांच्या निर्णयाविरोधात मराठवाडा शिक्षक संघाने रविवार (दि १) रोजी शाळा बचाव रॅली काढली. या रॅलीस एम एस जैन इंग्लिश शाळेपासून सुरुवात करण्यात आली. तर छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे रॅलीचा समारोप करण्यात आला.

श्री. महावीर स्थानकवासी जैन इंग्लिश शाळेतील अंतर्गत कलहामुळे शाळा बंद करण्याचा निर्णय संस्थाचालकांनी घेतला. त्या संदर्भाने शिक्षण विभागाला तशी माहितीही दिली होती. त्यावर आगामी शैक्षणिक वर्षांपासून ही शाळा बंद होणार होती. तशा आशयाचे फलकही शाळेच्या परिसरात लावण्यात आले होते. मात्र, संस्थाचालकांच्या निर्णयाला काही शिक्षकांनी विरोध केला असून या विरोधास मराठवाडा शिक्षक संघाने साथ देत शहरातून शाळा बचाव रॅली काढली. जैन शाळेपासून सुरुवात झालेली रॅली सुभाष चौक, महावीर चौक, मामा चौक, वीर सावरकर चौक, सुभाष रोड, फुल बाजार, काद्राबाद मार्गे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे समारोप करण्यात आला. रविवार (दि १) रोजी सकाळपासूनच पावसाने हजेरी लावली होती. या भर पावसात विविध घोषणाबाजी करत ही रॅली काढण्यात आली.

प्रसंगी मराठवाडा शिक्षक संघाचे प्रा. मारुती तेगमपुरे म्हणाले की, १९७३ पासून आजपर्यंत या शाळेने अनेक विद्यार्थी घडविले आहेत. विविध क्षेत्रात येथील विद्यार्थ्यांनी आपली छाप सोडली आहे. अशा वेळी ही शाळा बंद करण्याचा निर्णय हा राष्ट्र विकासासाठी बाधा ठरणारा आहे. शाळा बंद करणे आणि शाळेच्या माध्यमातून केवळ धंदा करणे या दोन्ही वेगवेगळ्या बाबी आहेत. संस्थाचालकांनी शाळा बंद करण्याचा घेतलेला निर्णय चुकीचा असून त्यांनी शिक्षकांच्या अडीअडचणी बसून कशा सोडवता येतील याचा विचार करणे गरजेचे असून शाळा बंद करण्याच्या निर्णयाचा पुर्नविचार संस्थाचालकांनी करावा असे आवाहनही प्रा. तेगमपुरे यांनी यावेळी केले.

यावेळी संजय येळवंते, आरेफ कुरेशी, ज्ञानोबा वरवटे, सोहम बोदवडे, इम्रान सिद्दिकी, सेवानिवृत्त शिक्षिका सुरेखा जोशी, शाळेच्या माजी विद्यार्थिनी साक्षी अंजान,



राजबाला झोळगीकर आदींनी आपल्या भावना व्यक्त करून शाळा बंद करण्याच्या निर्णयाला विरोध केला. यानंतर मराठवाडा शिक्षक संघाच्या शिष्टमंडळाने पोलीस निरीक्षक भारती यांच्या मार्फत श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाच्या अध्यक्ष व सचिवांना आपल्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

या रॅलीत मराठवाडा शिक्षक संघाचे भीमाशंकर शिंदे, नारायण मुंढे, जगन वाघमोडे, दीपक शेरे, प्रदुघ्न काकड, तुकाराम पडघन, भगवान धनगे, ज्योती पांगारकर यांच्यासह श्री एम. एस. जैन इंग्लिश स्कूलचे शिक्षक उर्मिला मांधना, संजोकता कत्तुल , दीक्षित एस, खान समीना, सोनाली वाघमारे, रूपाली जोशी, राजश्री बचाटे, दिपीका बोरकर, वर्षा गाजरे, पल्लवी कुलकर्णी, विना जोशी, काजल पाटील, वांगीकर वर्षा, देशमुख सविता,

पान २ वर

युवा आदर्श

## इव्हेंट पौळा ...

आता केवळ इव्हेंट
होऊ पाहे बैल पोळा
शहरी गर्दी गावांकडे
फॉलोअर्संवरी डोळा
भीत भीत बैलांपाशी
उभाराहतो मी खुळा
सणां मध्ये नाचताना
अंगाचा रे खुळखुळा
रिल्स साठी कायपण
स्वभाव हा नादखुळा
सणांतले महत्व सत्व
कळणारं न अवखळा
लाईक ते वाढवायला
का जीव होई बावळा
ओल नसे ती अंतरात
गोंधळ केवळ सावळा
फोटो सेल्फी घे जपून
आला कसा ओंबाळा
मुकीआहेत रे जनावरे
करालं इजा सांभाळा
कृतज्ञतेचे मोल किती
काय कळते टवाळा
अळवाचेप्रेम कशाला
आतून येवो जिव्हाळा
विसरू नये माणूसकी
विनंती करतो नृपाळा
खराअर्थ कळोपोळ्या
साद घालावी कृपाळा

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

झाडे लावा
झाडे जगवा

# राज्य सरकारच्या विरोधात जालन्यात महाविकास आघाडीचे जोडे मारो आंदोलन

**जालना । प्रतिनिधी -** मालवण येथे निकृष्ट पद्धतीने उभारलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा अवघ्या आठ महिन्यात कोसळल्यामुळे देशातील जनतेच्या अस्मितेला काळीमा फासणाऱ्या केंद्र व राज्य सरकारच्या विरोधात रविवार (दि १) रोजी जालना जिल्हा महाविकास आघाडीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात जोडो मारो आंदोलन करून शासनाचा तीव्र निषेध करण्यात आला.



छत्रपती शिवाजी महाराजांच्या कोसळलेल्या पुतळा प्रकरणी महविकास आघाडीच्या वतीने आज रविवारी जिल्ह्याच्या ठिकाणी जोडो मारी आंदोलन करून शासनाचा तीव्र निषेध करण्यात आला. या अनुषंगाने जालना येथेही महाविकास आघाडीच्या वतीने जोरदार आंदोलन करण्यात आले.यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शासनाच्या विरोधात जोरदार घोषणा देत जालनेकरांचे लक्ष वेधून घेतले. यावेळी आ.कैलास गोरंटयाल म्हणाले की, केंद्र आणि राज्य सरकार भ्रष्टाचाराने बरबटलेले असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा उभारण्याच्या कामात देखील भ्रष्टाचार करण्याचा नीचपणा करून देशाच्या अस्मितेला कलंक लावण्याचा दुर्दैवी प्रकार समोर आल्याने त्याच्या प्रवृत्तीची देशाला जाणीव झाली आहे असे सांगत आ. गोरंटयाल यांनी शासनाचा तीव्र शब्दात निषेध केला. शिवसेना उबाठा पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर म्हणाले की, महायुती सरकारने भ्रष्टाचाराचे अनेक मोठी प्रकरण केल्याचे उघड झाले आहे. परंतु हा प्रकार जनतेच्या अस्मितेचा असल्याने जनता त्यांना कदापि माफ करणार नाही. कार्यकर्त्यांनी त्यांचा

पान २ वर

## जाफराबाद येथे सरकार विरोधात जोडे मारो आंदोलन



### या सरकारचं करायच काय, खाली मुंडकं वर पाय... घोषणाबाजी

**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील महविकास आघाडीच्या वतीने रविवारी सकाळी ११ वाजेला छत्रपती शिवाजी महाराज चौकात सरकारला जोडे मारो आंदोलन करण्यात आले.

मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविण्यात केलेला भ्रष्टाचार, व निकृष्ट केलेले काम,यामुळे आठ महिन्यातच पुतळा कोसळण्याचे पापा या मींधे सरकारने केले आहे.या विरोधात पापात सहभागी असलेले भ्रष्ट सरकार मधील मुख्यमंत्री, व दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या बॅनर वरील फोटोला जोडे मारून आंदोलन करण्यात आले. आंदोलन सुरू असताना, या सरकारचं करायच काय, खाली मुंडकं वर पाय,

मिंधे सरकार हाय हाय, अशा अनेक घोषण यावेळी मिंधे सरकारच्या विरोधात देण्यात आल्या.

यावेळी शिवसेना तालुका प्रमुख कुंडलिक पाटील मुठ्ठे,कॉंग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर शिंदे,उपतालुका प्रमुख चंदु पा शिंदे,शहर प्रमुख देविसींह बायस,विभाग प्रमुख विष्णु पा लोखंडे, पंकज लोखंडे, समीर शहा,शेख इरफान,शेख मज्जित,सुनील गाडेकर, पंकज कायस्थ,सुनील लोखंडे, सुलतान कुरेशी प्रकाश शेळके,सह आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## काष्टेंची कविता ग्रामीण संस्कृती रुजवणारी - प्रा. देशमुख

**जाफराबाद । प्रतिनिधी -** येथे काष्टी सरांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करताना, प्रसिद्ध कवी तथा ग्रामीण कथाकार, यांनी आपल्या काष्टी सरांची कविता ग्रामीण संस्कृती रुजवणारी आहे. तुझ्या -माझ्यातले, शिदोरीच्या भाकरी काव्यसंग्रहांचे आ.दानवेंच्या हस्ते थाटात प्रकाशन

जाफ्राबाद ( प्रतिनिधी) : शहरापेक्षा ग्रामीण भागातील कवी, लेखक प्रामाणिकपणे लिहितात, ते बनवाबनवी करत नाहीत, याच परंपरेतील ड. विठ्ठल काष्टे यांनी माणसाबद्दल आस्था व करुणा ठेवून आपल्या भोवतालची माणसे, कष्टकरी स्त्रिया, गाव खेड्यातील वातावरणाचे जशास तसे चित्रण आपल्या काव्यात रेखाटले असून त्यांची कविता ग्रामीण संस्कृती रजविण्यासह वाचकांवर संस्काराची मांडणी करणारी आहे. असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक प्रा.केशव देशमुख ( पुणे )

पान २ वर



## शहरातील श्री गिरीधारेश्वर महादेव मंदिर प्रवेशव्दाराचा लोकार्पण सोहळा उत्साहात

माजी नगरसेवक ज्ञानेश्वर ढोबळे यांचे विशेष प्रयत्न

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील संजय नगर भागामध्ये नव्याने बांधण्यात आलेल्या श्री गिरीधारेश्वर महादेव मंदिर प्रवेशव्दार बांधण्यात आले आहे. याचा लोकार्पण सोहळा नुकताच पार पडला आहे. या लोकार्पण सोहळ्यानिमीत्त हनुमान मंदिर व श्री विठ्ठल रुक्मीणी मंदिर या दोन्ही मंदिराचे कलशरोहणाचा कार्यक्रम पार पडला आहे. नगरसेवक ज्ञानेश्वर ढोबळे यांच्या प्रयत्नातून हा कार्यक्रम पार पडला आहे.

या धार्मीक कार्यक्रमाच्या अनुषंगाने तीन दिवस विविध कार्यक्रम घेण्यात आले आहेत. यात पहिल्या दिवशी कलश मिरवणूक, दुसऱ्या दिवशी कलशरोहण यज्ञ, काल्याचे किर्तन व गिरधारेश्वर महादेव मंदिर प्रवेशव्दारे लोकार्पण व तिसऱ्या दिवशी महाप्रसाद कार्यक्रम पार पडला. या काल्याच्या किर्तनासाठी हभप महंत प्रेममुर्ती शिवाजी महाराज (श्रीक्षेत्र नारायणगड) यांच्याहस्ते कलशरोहण करण्यात येऊन काल्याचे किर्तन झाले. याप्रसंगी भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. तसेच गिरधारेश्वर महादेव मंदिराचे लोकार्पणासाठी माजी केंद्रीयमंत्री रावसाहेब दानवे, माजी नगराध्यक्षा संगीता गोरंट्याल, नगरसेवक महेश निकम, सतीष जाधव, शशीकांत घुगे, सुनील राठी, बद्री पठाडे, धन्नु काबलीये, गोवर्धन कोल्हे, सिध्दीविनायक मुळे, सुनील पवार, चंपालाल भगत, संजय देठे, गोपाल ठोंबरे, राजकुमार दांडगे, गणेश भोंगे, परमेश्वर खुपसे, ज्ञाने, उत्तमराव ढोबळे, गणेश ढोबळे, किशोर राऊत,

पान २ वर



# संपादकीय

## गणेशोत्सवात विधायक कामे करावीत

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करून आज १३० वर्ष झाली. इंग्रजांच्या राजवटीत भारतीय संस्कृतीची उघड उघड विटंबना होत होती. इंग्रजांच्या दमनशाही विरुद्ध तरुण एकत्र यायला तयार नव्हते. तरुणांना एकत्र आणल्याशिवाय इंग्रजांविरुद्ध लढा देणे अशक्य आहे हे ओळखून लोकमान्य टिळकांनी तरुणांना एकत्र आणण्यासाठी व त्यांच्यात देशभक्तीची मशाल पेटवण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. हळूहळू सार्वजनिक गणेशोत्सव ही महाराष्ट्राची परंपरा बनली. आजही ती परंपरा मोठया भक्तिभावाने जोपासली जाते. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला सार्वजनिक गणेशोत्सव महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात गणेशोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो. गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा मानबिंदू आहे. गणेशोत्सव महाराष्ट्राची ओळख आहे. लवकरच गणेशाचे आगमन होणार आहे. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांच्या कालावधीत सर्वच गणेशभक्त गणेशाची मनोभावी पूजा करतात. सर्वत्र उत्साहाचे आणि जल्लोषाचे वातावरण असते मात्र अलीकडच्या काळात गणेशोत्सवाचे हे स्वरूप बदलू लागले आहे. टिळकांनी ज्या उद्देशाने हा सण सुरू केला तो उद्देशच आता हरपला आहे. इतकेच काय पण या उत्सवाचे पावित्र्यही कमी होऊ लागले आहे. आज गणेशोत्सव हा उत्सव न राहता इव्हेंट बनला आहे. उंचच उंच मूर्तींची जणू स्पर्धाच सुरू झाली आहे. या मोठ्या मुर्त्या समुद्राच्या पाण्यात विसर्जित करताना दोरीच्या साहाय्याने बांधाव्या लागतात. उंचच उंच मूर्तीचे अवडंबर न माजवता पर्यावरण पूरक गणेश मूर्ती खरेदी करून तिची प्राणप्रतिष्ठा करावी. शास्त्रानुसार शाडूच्या मातीने गणेश मूर्ती बनवावी, असे सांगितले आहे असे असतानाही सर्रास प्लॅस्टर ऑफ पॅरिसपासून मुर्त्या बनवल्या जातात. या मुर्त्या पाण्यात विरघळत नसल्याने पाण्याचेही प्रदूषण होते. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांत ध्वनी प्रदूषणही खूप वाढते. गणेशोत्सवात डॉल्बीच्या स्पीकरवर मोठमोठ्या आवाजात गाणी लावून चित्रपटांच्या गाण्यावर हिडीस नृत्य करण्याची फॅशन रूढ झाली आहे. या डॉल्बीचा आवाज इतका मोठा असतो की त्याचा परिणाम लहान मुले व जेष्ठ नागरिकांच्या श्रवण इंद्रियांवर होऊ शकतो. उत्सवाच्या नावाखाली वर्गणी उकळली जाते प्रसंगी धमकीही दिली जाते. त्यावरही गणेशभक्त नाराज आहेत. भक्तांनी जितकी वर्गणी दिली गणेश मंडळांनी तीच दान म्हणून स्वीकारावी. गणेशोत्सवात डोळे दिपवणारी रोषणाई केली जाते त्यामुळे विजेचाही अपव्यय होतो. तेंव्हा सजावटी रोषणाई यावर मर्यादा घालावी. काही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आपल्या मंडळाचे मार्केटिंग करत आहेत. नवसाला पावणारा गणपती अशी जाहिरात करून सिलेंब्रेटींना बोलवले जाते. त्यातूनच मग मंडळा- मंडळामध्ये मतभेद होऊन तेढ निर्माण होते त्यातूनच मग कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. टिळकांनी गणेशोत्सव साधेपणाने साजरा करण्यास सांगितले आहे. दुसऱ्यांना त्रास होऊ न देता गणेशोत्सव साजरा केला पाहिजे. गणेश मंडळांनी दहा दिवसांच्या कालावधीत सामाजिक उपक्रम राबवले पाहिजेत. गणेश मंडळांनी समाजाला उपयोगी पडतील अशी विधायक कामे करावीत. रक्तदान शिबिर, दुष्काळग्रस्तांना, पूरग्रस्तांना मदत तसेच गरीब आणि कोरोना काळात पालक गमवलेल्या अनाथ मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारावे. अनाथ आश्रम, वृद्ध आश्रमांना मदत करावी. गणेश मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला पाहिजे. मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या गीत गायन स्पर्धा, नृत्य स्पर्धा यांचे आयोजन करावे. गणेश ही बुद्धीची देवता आहे त्यामुळे विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता वाढीस लागेल असे उपक्रम राबवावेत. हा उत्सव जितका साधेपणाने साजरा केला जाईल तितकेच त्याचे पावित्र्य कायम राहील आणि भक्तांनाही त्याचा आनंद लुटता येईल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# बैलपोळा; बैलांना सन्मानाचे आमंत्रण!

श्रावण महिन्यात सणांची रेलचेल पहायला मिळते. अनेक सण या महिन्यात आपल्या भेटीला येतात. पावसाचे दिवस असल्याने सृष्टी आधीच हिरवाईचा शालू नेसून नव्या नवरीवानी सजलेली असते. संपूर्ण वातावरणात एक प्रकारचा गारवा पसरल्याने मानवी मन देखील ताजे तवाने झालेले असते. अशा या श्रावण महिन्यात आपण नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी यांसारखे सण साजरे करतो आणि या श्रावण महिन्याची सांगता होते ती श्रावण महिन्याच्या अखेरीस येणाऱ्या पोळा या सणाने! तो बैलपोळा व तान्हापोळा असा दोन दिवसांचा असतो. पोळ्याची गाणी- झडत्यांमुळे सानाथोरांचे खुप मनोरंजन होते-

पोया रे पोया, बैलांचा पोया।
तुरीच्या दायीने, मारला हो डोया।।
कांद्याने आमचे, केले हो वांदे।
ऊसवाला बाप, ढसा ढसा रडे।।
एक नमन गौरा पार्बती; हर बोला, हर हर महादेव..!

श्रावण अमावस्येला अर्थात पिठोरी अमावस्येला शेतकरी बांधव आपल्या सर्जा-राजाचा हा सण अत्यंत आनंदाने आणि उत्साहाने साजरा करतांना आपल्याला दिसतात. पुणे मुंबई यांसारखी मेट्रो शहरे या सणाविषयी कदाचीत अनभिज्ञ असावीत, एवढी ती वाढली आहेत. या शहरांची धावपळ पाहिली, की पोळा या सणाची यांना काही माहिती आहे की नाही, असे वाटते. परंतु या शहराच्या आसपासची गावे आणि संपूर्ण महाराष्ट्रात बळीराजा मात्र आपल्या जिवाभावाच्या सोबत्याचा हा सण अत्यंत पारंपारिक पध्दतीने आजही साजरा करतांना दिसतो. पोळा या सणाच्या आदल्या दिवशी बैलांना रितसर आमंत्रण देण्याची पध्दत आहे बरं का? शेतकरी प्रेमाने बैलांना म्हणतो, की आज आवतन घ्या; उद्या जेवायला या! वरून झडती हाक-

वाटी रे वाटी खोबऱ्याची वाटी।
महादेव रडे दोन पैश्यासाठी।।
पार्बतीच्या लुगड्याले छप्पन गाठी।
देव कवा धावल गरिबांसाठी?
एक नमन गौरा पर्बती; हर बोला, हर हर महादेव..!

असे आमंत्रण या बैलांना दिले जाते. दुसऱ्या दिवशी सकाळी बैलांना नदीवर नेले जाते, त्यांना झकास अंघोळ घालण्यात येते. घरी आणल्यावर त्यांच्या सर्वांगावर गेरूचे ठिपके दिले जातात. शिंगाना आरसे, चवारे, बेगड, डोक्याला बाशिंग, गळ्यात कवड्या व घुंगरांच्या माळा घातल्या जातात. पायांमध्ये चांदीचे किंवा करदोड्याचे तोडे घालतात. नवी वेसण नवा कासरा घातल्यानंतर अंगावर रेशमी नक्षीकाम केलेली झूल पांघरली जाते. कैलासातील महादेवाच्या नंदीलाही लाजवेल, अशी बैलजोडी शृंगारली जाते. जनावरांचा गोठा स्वच्छ करण्यात येतो. घरातील सुवासीनी बैलांची विधीवत पूजा करतात. बैलांकडून पोळ्याच्या दिवशी कोणतेही काम करून घेतले जात नाही. गोडधोड, पुरणपोळीचा घास त्यांना भरवला जातो. बैलांची कायम निगा राखणाऱ्या बलक्याला- गड्याला नवे कपडे दिले जातात. बालपणी आपण त्यांच्या सजण्याचे वर्णन कवितेतून वाचत होतो-

शिंगे रंगविली, बाशिंगे बांधली!
चढविल्या झूली, ऐनेदार!!

बैलांचे जेवण झाल्यानंतर सायंकाळी त्यांना गावाबाहेर मंदिरात नेले जाते. सर्व शेतकरी आपापल्या जोड्या घेऊन असल्यास मारुतीच्या मंदिराजवळ किंवा एका ठिकाणी एकत्र येतात. आंब्याच्या पानांचे तोरण बांधून बैलांना रांगेत उभे करण्यात येते. ढोल, ताशे, नगारे आदी वाद्य वाजवले जातात. झडत्या- पोळ्याची गाणी म्हटली जातात. येथे बैलांच्या शर्यती देखील आयोजित केल्या जातात. ज्याच्या जोडीला सर्वात चांगले तयार केले वा सजवले असेल, त्या जोडीला पारितोषीक दिले जाते. आपापल्या गावातील परंपरेनुसार उत्सव साजरा झाल्यानंतर किंवा पोळा फुटल्यानंतर कार्यक्रम संपन्न होतो. घरी निघतांना बैलांना घरोघरी नेल्या जाते. तेथे आयाबाया बैलांची पूजा करतात. बैल नेणाऱ्यास बोजारा- पैसे देण्याची प्रथा रुढ आहे. हिंदू संस्कृतीत वृक्षांप्रमाणेच वन्यजिवांना देखील पुजनीय मानल्या जाते. झडती खुणावते-

पोळा रे पोळा, पाऊस झाला भोळा!
शेतकरी हीतासाठी, सगळे व्हा गोळा!
एक नमन गौरा पर्बती; हर बोला, हर हर महादेव..!!

वर्षभर शेतात शेतकऱ्यासमवेत बरोबरीने राबणाऱ्या बैलांप्रती एक दिवस उतराई होण्याची संधी म्हणून पोळा या सणाकडे आपण पाहातो. पूर्वापार चालत आलेल्या रूढी परंपरांप्रमाणे हे उत्सव आजही गावागावांमधून उत्साहात साजरे होतांना आपल्याला दिसतात. बैलपोळा सर्व शेतकरी बांधवांना सुख समृद्धीवर्धक ठरो!

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे.**
**रामनगर- गडचिरोली, ७७७५०४१०८६.**

# नवीन अल्बम दिल परेशान करता है लॉन्च

पद्मविभूषण पंडित हरिप्रसाद चौरसिया, क्रिकेटपटू सुनील गावस्कर, पद्मश्री अनुप जलोटा, गदर दिग्दर्शक अनिल शर्मा यांच्यासह अनेक सेलिब्रिटींची उपस्थिती. मुंबईतील आयोजित कार्यक्रमात, ज्येष्ठ गीतकार गुलजार साहब, संगीतकार आणि संगीतकार पंडित भावदीप जयपूरवाले आणि गायक सुमित टप्पू यांनी त्यांचा नवीन अल्बम दिल परेशान करता है लाँच केला. यावेळी पद्मविभूषण पंडित हरिप्रसाद चौरसिया, भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार आणि अप्रतिम फलंदाज सुनील गावसकर, पद्मश्री अनुप जलोटा, गदर दिग्दर्शक अनिल शर्मा, गायक नितीन मुकेश, चंदन दास, घनश्याम वासवानी, श्याम सिंघानिया, ललित पंडितप्रमुख अरुण गोविल, जेडी मजिठिया, विजय दयाल, आनंद डाबरे, अशोक खोसला, कुणाल गांजावाला यांच्यासह अनेक सेलिब्रिटी उपस्थित होते. सुमित टप्पूचे वडील महेंद्र टप्पू आणि सुमितची पत्नीही ह्या कार्यक्रमात उपस्थित होत्या. रखशिन्दा यांनी कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन केले. अल्बमची दोन व्हिडिओ ह्या कार्यक्रमात गाणी दाखवण्यात आली जी सर्वांना आवडली. एक गाणे हमने तुम्हारी याद का मौसम बुला लिया, एक गम बुझा दिया कभी एक गम जला लिया आहे तर दुसरे गाणे समंदर होते जे समुद्रकिनारी चित्रित केले आहे. या खास प्रसंगी, गुलजार साहब यांचा ९० वा वाढदिवसही भव्य केक कापून साजरा करण्यात आला. सुनील गावसकर यांनी गुलजार साहेबांना शतक पूर्ण करण्याची विनंती केली तेव्हा ते म्हणाले की, मी माझे बेस्टच देण्याचा प्रयत्न करणार.

पद्मश्री अनुप जलोटा म्हणाले की, माझा शिष्य सुमित टप्पू खूप चांगला गायक झाला आहे याचा मला खूप आनंद आहे. गुलजार साहेबांचे गाणे गाणारा प्रत्येक गायक हा खूप लोकप्रिय झाला आहे. सुमित ने तर ७ गाणी गायिली आहेत तर त्यांची लोकप्रियता सगळीकडे पसरेल यात शंकाच नाही . सुमितने अतिशय आत्मविश्वासाने गाणी गायली आहेत. या अल्बममध्ये सात गाणी आहेत , ज्यामध्ये गुलजार साहब यांनी सादर केलेल्या सात वेगवेगळ्या शायरी आहेत, ज्यात सुमित टप्पू यांच्या सुरेल आणि मंत्रमुग्ध गीत आहेत . पंडित भवदीप जयपूरवाले यांचे म्युज़िक अरेंजमेंट्स, लाइव इंस्ट्रूमेंट्स आणि एक सुंदर वायलिन सिम्फनी यांनी सजलेला हा अल्बम चित्रपटेतर संगीत क्षेत्रातील दुर्मिळ आवाज जाणवतो.

गुलजार साहेबांची कालातीत आणि सखोल वैचारिक कविता हृदयाला भिडते आणि प्रेम, जीवन आणि तत्त्वज्ञानाच्या सारावर चिंतन दर्शविते. त्यांच्या भावनिक कविता




आणि शब्दांच्या खोलीसाठी ओळखले जाणारे, गुलजार यांनी प्रेमापासून आशापर्यंत विविध विषयांवर स्पर्श करणारी गाणी रचली आहेत. गुलजार साहेबांच्या चरणांना स्पर्श करून अभिनेते अरुण गोविल म्हणाले की, सुमीतने फिजीमध्ये काही कार्यक्रम केले असल्याने त्यांचे आणि सुमीतचे चांगले संबंध आहेत. दिल परेशान करता है हे टायटल फक्त गुलजार साहेबच देऊ शकतात. जेंव्हा ते बोलतात तेव्हा असे वाटते की शायरीचा करत आहेत. त्यांनी जे लिहिले आहे ते आपण वाचतो, ऐकतो तेव्हा आपल्याला वाटते की ही गोष्ट आजपर्यंत का समजली नाही. अनूप जलोटा यांचे शिष्य सुमितने हे स्थान मिळवले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. सुमीत टप्पू, ज्याला यापूर्वी भारतीय संगीत उद्योगातील योगदानाबद्दल प्रशंसा मिळाली आहे, तो या अल्बमबद्दल खूप उत्सुक आहे. कृतज्ञता व्यक्त करताना तो म्हणाला, गुलजार साहेबांसोबत काम करणे हे स्वप्न पूर्ण होण्यापेक्षा कमी नाही. ते साहित्य क्षेत्रातील एक महान व्यक्तिमत्व म्हणून उभे आहेत, जे महान कवी मानले जातात. त्यांचे हृदयस्पर्शी शब्द माझ्या मनात खोलवर गुंजले, माझ्या कवितेचे आकलन आणि कौतुक घडवले. त्यांच्या खोल आणि गुंतागुंतीच्या कवितांना माझा आवाज देण्याची संधी एक व्यावसायिक म्हणून माझ्यासाठी केवळ संस्मरणीय नाही तर शब्दांच्या पलीकडे जाणारा सन्मान आहे. सुमीत टप्पू यांनी पंडित भवदीप जयपूरवाले यांच्या रचना आणि संगीत दिग्दर्शनाचेही कौतुक केले. अल्बममधील भवदीप जी यांची रचना आणि संगीत दिग्दर्शन उत्कृष्ट आहे. ही सातही गाणे वेगवेगळ्या रगांमध्ये रचलेली आहेत, ज्यात एक अनोखा दृष्टीकोण, शैली आणि संगीत वितरण दिसून येते. मला खात्री आहे की संगीतप्रेमी या अल्बमचे मनापासून कौतुक करतील. पंडित भवदीप जयपूरवाले, आणि गुलजार साहब यांच्याशी २५ वर्षांचा सहवास आहे, ते पुन्हा एकदा दिग्गज व्यक्ती सोबत काम करत आहेत. महान गुलजार साहेबांसोबत काम करणे हे प्रत्येक संगीतकाराचे नेहमीच स्वप्न राहिले आहे आणि 'दिलशरारत करता है' सोबत ते स्वप्न साकार झाले आहे. त्यांच्या कामाप्रतीची नम्रता आणि समर्पण खरोखरच प्रेरणादायी आहे. ह्या अल्बम सोबत आमची २५ वर्षे पूर्ण होत आहे. 'वादा' या अल्बमने ह्या प्रवासाची सुरुवात झाली होती , सुमीतने त्याच्या सुमधुर आवाजाने या गाण्यांना जीवदान दिले याचं मला मनापासून कौतुक वाटतं 'दिल शरारत करता है' मध्ये संगीतकार म्हणून योगदान दिल्याचा आनंद आहे. गुलजार हे भारतीय साहित्य आणि चित्रपटसृष्टीतील एक प्रतिष्ठित व्यक्तिमत्व आहे, ज्यांनी प्रत्येक पिढीतील प्रेक्षकांना आवडलेली सदाबहार गाणी रचली आहेत. गाण्यांमध्ये कथा विणण्याच्या क्षमतेमुळे ते अनेक कलाकारांचे आवडते गीतकार आहेत. गुलजारचे शब्द सुमीत टप्पूने ज्या पद्धतीने गायले आहेत, त्यामुळे हा अल्बम पारंपरिक आणि समकालीन श्रोत्यांना आकर्षित करेल अशी अपेक्षा आहे. या अल्बमच्या लाँचने चाहत्यांमध्ये आणि इंडस्ट्रीमध्ये उत्साह निर्माण केला आहे.

## पान १ वरुन

### मराठवाडा शिक्षक ...

रश्मी गोगटे, प्रशांती झोडगीकर , श्रुती मेहुलकर, शारदा यादव , अनिता परमार , पल्लवी बांगर , मनीषा क्षीरसागर , शोभा ठोकळ , भिकाजी चेडे , प्रतिक क्षीरसागर , ज्ञानेश्वर देशमुख , लखन राजपूत , मनोज राजपूत , श्याम राठोड, सुनील चव्हाण , भगवान अंभोरे मनोज बसय्ये, शाम नंद मुरलीधर लबडे आदींचा समावेश होता..

### राज्य सरकार ...

हा निंदनीय प्रकार गावागावात जाऊन सांगावा आणि हे भ्रष्ट सरकार खाली खेचल्याशिवाय जनता गप्प बसणार नाही असा विश्वास शेवटी अंबेकर यांनी व्यक्त केला. तर राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशमुख यांनी सदर घटनेचा तीव्र शब्दात निषेध करत महायुतीचे सरकार खाली खेचून जनता सरकारचा बदला निश्चितपणे घेईल असा विश्वास व्यक्त केला. यावेळी माजी आमदार संतोष सांबरे, शिवसेना नेते डॉ.संजय लाखे पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख ए.जे. बोराडे, शहरप्रमुख बाला परदेशी, जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष राजेंद्र राख, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष नंदकिशोर जांगडे यांनी आपल्या भाषणातून राज्य शासनाचा तीव्र शब्दात निषेध केला. या आंदोलनाचे प्रास्ताविक करतांना जालना शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष शेख महेमुद यांनी आंदोलनामागील भूमिका विषद केली. यावेळी युवा नेते अक्षय गोरंटयाल, रमेश पाटील गव्हाड, मुरलीधर शेजुळ, मनीष श्रीवास्तव, राम सावंत, नंदाताई पवार, वसंत जाधव, दिनकर घेवंदे, हरिहर शिंदे, बाबू पवार, मनकरनाताई डांगे, गंगुबाई वानखेडे, मंगल मिटकर, विभा लाखे, राजेंद्र जाधव, दुर्गेश काठोठीवाले, महावीर ढक्का, रमेश गौरक्षक, जगदीश भरतिया, कृष्णा पडूळ, सय्यद अझहर, शेख शकील, विनोद रत्नपारखे, विजय पवार, विनोद यादव, योगेश पाटील, किशोर गरदास, गोपाल मोरे, आनंद वाघमारे, राजन बर्टी, प्रमोद अल्हाट, गुड्डू खान, करीम लिडर, विकास जगधने, अशोक भगत, शेख फारुख, गणेश चांदोडे, बाबासाहेब सोनवणे, जावेद अली, नारायण वाढेकर, शेख इर्शाद, नारायणराव शिंदे, जलिंधर डोईफोडे, रघुवीर गुडे, शेख वसीम, बाळकृष्ण कोताकोंडा, संजय पाखरे, अनास चाऊस आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### काष्टेंची कविता ...

यांनी केले. अनुभव प्रतिष्ठानच्यावतीने ग्रामीण कवी ड. विठ्ठल काष्टे रचित तुझ्या -माझ्यातले, शिदोरीच्या भाकरी काव्यसंग्रहांचे रविवारी ( ता. ०१) आ.संतोष दानवेंच्या हस्ते गुरुकृपा लॉन्स येथे थाटात प्रकाशन करण्यात आले. चित्रकार श्रीधर अंभोरे ,कवयित्री डॉ. संजीवनी तडेगावकर, प्रा. मधुकर जोशी, ड. विठ्ठल काष्टे,सौ.मीरा काष्टे, पंडितराव तडेगावकर,सुरेश दिवटे, ड. रामेश्वर अंभोरे, यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ.संजीवनी तडेगावकर यावेळी म्हणाल्या , प्रेम म्हणजे फक्त लफडं एवढ्या पुरतं संकुचित करून ठेवलंय. विठ्ठल काष्टे यांनी आपल्या कवितेतून प्रेमाची नितळ , व्यापक संकल्पना मांडली असून त्यांची कविता जनपद पदाच्या चालीरीती व्यक्त करते, समृद्ध बोलीभाषेचा अनुभव त्यांच्या कवितेत आढळतो. असे नमूद करत जाफ्राबादचा साहित्यिक, सांस्कृतिक वारसा वाढविण्यासाठी आ. दानवेंनी सांस्कृतिक सभागृह उभारणीसाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी डॉ. तडेगावकर यांनी केली.

प्रस्ताविकात ड. विठ्ठल काष्टे यांनी कविता ही केवळ शब्दांचा खेळ नसून अंतःकरणाच्या गाभ्यातून आली पाहिजेत केवळ शब्द पांडित्य असून चालत नाही तर स्वतः प्रामाणिक असावे हीच भूमिका घेऊन शेती, शेतकरी, काबाडकष्ट करणाऱ्या स्त्रिया, ग्रामीण जीवनाचे गुणवैशिष्ट्ये उत्कटतेने काव्यसंग्रहात मांडल्या असून डॉ. संजीवनी तडेगावकर यांच्या सूचनेवरून कोरोना काळात काव्यसंग्रह पूर्ण करता आले असे ड. काष्टे यांनी स्पष्ट केले.

सूत्रसंचालन प्रा.मधुकर जोशी यांनी केले तर ड. रामेश्वर अंभोरे यांनी आभार मानले. कार्यक्रमास रमेश पाटील गव्हाड ,गोविंदराव पंडित, राजेश चव्हाण, कथाकार बबन महामुने, कमलाकर कळकुंबे, डॉ. शेषराव पालकर, दीपक पाटील वाकडे, दुर्गेश नवले, पुरुषोत्तम काष्टे, मोहनराव मुळे, गजानन उदावंत, सुनील साळवे, सचिन जैस्वाल,ड.देवडे, कव्हळे ,खंडेलवाल यांच्यासह वकील ,व्यापारी, शेतकरी, महिला व रसिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**न पुसणारा ठेवा - आ.संतोष दानवे**

आपला वकिली व्यवसाय सांभाळत ड. विठ्ठल काष्टे यांनी अंतःकरणातून कवितासंग्रहांची रचना केली त्यांचे साहित्य हे कधीच न मरणारे असून तालुक्याला नव्हे साहित्य विश्वाला त्यांनी अनमोल शिदोरी दिली आहे. असे गौरवौद्गार आ.संतोष पाटील दानवे यांनी काढले. जाफ्राबाद शहरासाठी आपण ७५ लाखांचा निधी दिला असून नगरपंचायतने जागा उपलब्ध करून दिल्यास सांस्कृतिक सभागृह उभारणी करणार असल्याचे आ. दानवे यांनी सांगितले. पाटील तुमचं समद चुकलं ही ड. काष्टे यांची कविता त्यांनी सादर केली.

### शहरातील श्री गिरधारी ...

पवन गाडेकर, सुदर्शन शेंडे, शेरकर, संभाजी भोसले, नंदकुमार खरात, मधुकर पडूळ, संतोष निकम, रत्नाकर जाधव, वैशिष्ट माने, सुरज ढोबळे, केशव चोरमारे, दत्तात्रय डोंगरे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भजनी मंडळासह परिसरातील नागरिकांनी परिश्रम घेतले आहे.

**श्री गिरधारेश्वर रिक्षा स्टॉपही सुरु**

जालना शहरातील संजयनगर भागात याच कार्यक्रमानिमीत्त श्री गिरधारेश्वर रिक्षा स्टॉपही सुरु करण्यात आला आहे. या ठिकाणी रिक्षा थांबणार असून, या परिसरातील प्रवाशांना ये-जा करण्यासाठी हा स्टॉप असणार आहे.

# एक आदर्श यशस्वी नेत्रतज्ज्ञ...

दृष्टी दाते, जग सुंदर आहे याची अनुभूती देणारे एक आदर्श यशस्वी साधक. शांत, संयमी, अभ्यासू, चिंतनशील, विवेकी, विज्ञाननिष्ठ, निर्गवी, नेत्र चिकित्सा पारंगत, अचूक अनुभवजन्य निदान, यथायोग्य उपचार,यशस्वी सर्जरी करणारे सर्जन. गोरगरीब गरजूंना सातत्यपूर्ण आणि प्रसंगी माफक दरात वा मोफत सेवा देणारा देवमाणूस. सेवार्थी नेत्रतज्ज्ञ डॉ.सुधीरजी यादव यांच्या निष्काम सेवाकार्याला माझा मानाचा मुजरा. वैद्यकीय सेवेत जनसामान्यांना समजून घेत, त्यांचं दुःख हलकं करत, समाधानाची,आनंदाची अनुभूती देणारे एक कुशल,यशस्वी नेत्रतज्ज्ञ म्हणून आपली जनमाणसात ख्याती आहे. साहेबजी, आपल्यातील सर्जनशील वृत्ती अनेक नवनवीन आवाहनांची उकल करणारी, कठीणातील कठीण शस्त्रक्रियेला सकारात्मक बनविणारी,अशी आहे.



सुंदर जगाचं दर्शन घडविणारे तुम्ही. दृष्टीहिनांना दृष्टी प्रदान करत आनंद बहाल करणारे कुशल निपूणत्व असणारे आपले कार्य अभिनंदनिय आणि अभिमानास्पद असे आहे. आपल्या अंतरी असणारी सेवेची सवय,साधनेतील सौंदर्याला झळाळी देते.तुम्हीच,नजरेत जग सारं सामावण्याची अनेकांना क्षमता प्रदान केली.सेवेशी प्रामाणिक राहात अहोरात्र रुग्णसेवा आपण करत आहात. पराकोटीचे प्रयत्न करताना यशस्वीता हाच आपला ध्यास राहीला आहे.साहेबजी, आपले सतशील चारित्र्य ही आमची प्रेरक प्रेरणा आहे. परिवारा सह रुग्णसेवा परिघात आपल्या जिद्दी, जिज्ञासू,कल्पक, अभ्यासपूर्ण संयमित अशा वाटचालीत अनेकदा आपल्या यशाला पाठबळ देणाऱ्या आपल्या धर्म पत्नी सुप्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. जयश्री ताईंचं फार मोठं योगदान राहीले आहे.वैद्यकीय सेवेत तुम्हां व्दयांची कामगीरी स्वतंत्र अशी आहे.आपणा सह,डॉ.जयश्री ताईंनी आमच्या महाविद्यालयाच्या अनेक आरोग्य शिबीरांना सहज निमंत्रण स्विकारत हजेरी लावत सेवा दिली. हे तुम्हा व्दयां मधील दातृत्व विलोभनीय सुंदर असून आदर्शवत आहे.गेली २८ वर्ष जिल्हा सामान्य रुग्णालय परभणी येथील नेत्र चिकित्सालयात सेवा काळात जवळजवळ १९ हजार यशस्वी शस्त्रक्रिया आपल्या हातून झाल्या हे आपले कार्य गौरवास्पद आहे.असेच सेवाकार्य भविष्यातही आपल्या हातून घडत राहो, अधिक उत्तमोत्तम रुग्ण सेवा आपल्या हातून घडावी,करिता आमचे मार्गदर्शक ॲड. बाळासाहेब जामकर साहेब आणि ड.बाळासाहेब जामकर मित्र मंडळाचे अध्यक्ष प्रकाश कौसडीकर, उपाध्यक्ष डी.के.कदम, सचिव यांच्या वतीने आपणास सेवानिवृत्ती निमित्त शुभेच्छा !

**प्रा.अरुण पडघन, कार्याध्यक्ष, ॲड. बाळासाहेब जामकर मित्र मंडळ, परभणी.**

# लैंगिक छळ, अयोग्य स्पर्श व त्रासाबाबत आई-वडिलांसह शिक्षकांना अवगत करावे

## आयुष नेपानी : रोटरीच्या टिन्स अभियानांतर्गत सातवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांशी साधला संवाद

**जालना । प्रतिनिधी -** लैंगिक छळ, वाईट स्पर्श अथवा कुणाचा त्रास असेल तर मुलांनी शिक्षक व आई-वडिलांना सांगावे. अशा घटनांपासून सजग राहण्यासाठी पालकांनीही आपल्या पाल्याशी निखळ संवाद, परखड पण मैत्रीपूर्ण नातं प्रस्थापित करून मुलांना त्यांच्या सुरक्षिततेची जाणीव करून देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांनी येथे केले.

सशक्त समाज, जागरूक आणि जबाबदार युवक घडावेत, या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ जालना, जालना पोलीस व जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने बाल गुन्हेगारी, बाल लैंगिक छळ प्रतिबंधक पोक्सो कायदा व किशोरवयीन मानसिकता या विषयावर संवेदनशीलता निर्माण करणारे टिन्स अभियान राबविले जात असून, त्या अंतर्गत जालना एज्युकेशन फाउंडेशनच्या मोफत शिकवणी प्रकल्पातील इयत्ता सातवी ते बारावी इयत्तेतील विद्यार्थ्यांसाठी आयोजित कार्यक्रमात श्री. नोपानी बोलत होते. व्यासपीठावर जालना एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. सुरेश लाहोटी, अध्यक्ष सुनील रायठठ्ठा, रोटरी क्लब ऑफ जालनाचे अध्यक्ष डॉ. दीपक बगडिया यांची उपस्थिती होती. श्री. नोपानी पुढे म्हणाले की, बदलापूर येथील घटना समोर आल्यानंतर चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेने मुलांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न उपस्थित झाला. अशा परिस्थितीत पालकांनी सज्ज होण्याची गरज आहे. वयात आलेल्या मुला-मुलींना एकमेकांबद्दल आकर्षण असते. मात्र, या वयात शिक्षण हेच ध्येय समोर ठेवावे. प्रेमाच्या भानगडीत पडू नका, असा सल्ला त्यांनी दिला. स्वतःबद्दल कधीही वाईट विचार करू नका. स्वतः प्रति चांगला भाव ठेवावा. मी चांगला आहे, मेहनती आहे, चांगले काम करू शकतो, असा विचार करत रहा. आपण आनंदी राहिलो तर सर्व गोष्टी चांगल्या वाटतात, असे सांगून सकारात्मक विचार, संयम, शिस्त, ज्ञान, कठोर परिश्रम आणि आत्मविश्वास या बाबी यशाची गुरुकिल्ली असल्याचे त्यांनी सांगितले.



याप्रसंगी सुनील रायठठ्ठा यांनी युवा पिढीने मोठी स्वप्ने पहावीत आणि या स्वप्नांचा पाठलाग करावा, असे सांगून शिक्षकच विद्यार्थ्यांचे जीवन बदलू शकतात. त्यामुळे आपली नाळ शिक्षकांबरोबर जुळवून घ्यावी लागेल, असे ते म्हणाले.

रोटरी क्लब ऑफ जालनाने स्वच्छतेबाबत विद्यार्थ्यांच्या माध्यमातून जनजागृतीस सुरूवात केलेली आहे. शालेय विद्यार्थी या अभियानात महत्वपूर्ण भूमिका निभावू शकतात, या उद्देशाने याप्रसंगी रोटरीच्या प्रकल्प प्रमुख वर्षा पित्ती आणि रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. दिपक बगडिया यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून आपला परिसर आणि शहर स्वच्छ ठेवण्याची साद घातली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उदय शिंदे यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार रोटरीचे सचिव रवी भक्कड यांनी मानले.

# किरकोळ कारणावरून तरुणावर चाकू हल्ला, कदीम पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल



**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात किरकोळ कारणावरून तरुणावर चाकू हल्ला करण्यात आलाय. या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झालाय. रेहान रशीद शेख असं जखमी तरुणाचे नाव असून त्याच्यावर शहरातील सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. रेहान रशीद शेख याच्या कडे शेख आदिल शेख कलीम, अफरोज खाज्या शहा आणि अजय आढाव यांनी दारू पिण्यासाठी पैसे मागितले होते. मात्र पैसे देण्यास रेहान शेख याने विरोध केला, त्याचा राग मनात धरून शेख आदिल आणि अफरोज शहा यांनी रेहान वर चाकूने वार करून पोटात व छातीजवळ मारून गंभिर जखमी केलंय. तसेच रेहान जवळील ६४० रुपये आणि त्याचा मोबाईल फोन घेऊन ते तिघे पसार झालेत. सदर घटना ही दिनांक ३१ शनिवार रोजी रात्री साडेआठच्या सुमारास जालना शहरातील जैन मंदिर जवळील भाग्यनगर कडे जाणाऱ्या रोडवरील घडली असून या प्रकरणी रेहानची आई रियाजबी शेख रशीद यांच्या फिर्यादीवरून आज दिनांक एक रविवार रोजी रात्री ०४:३० वाजेच्या सुमारास कदीम जालना पोलिस ठाण्यात नवीन कायद्याप्रमाणे कलम १०९, ११९(१), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलाय. या प्रकरणातील पुढील तपास कदिम पोलीस करीत आहेत

# बाबुराव जाफ्राबादकर माध्यमिक विद्यालयात महावाचन चळवळ महोत्सव!



**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** कै. बाबुराव जाफ्राबादकर माध्यमिक विद्यालयामध्ये 'महावाचन चळवळ महोत्सव' घेण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध पुस्तके शाळेच्या प्रांगणात ग्रंथालयातून आणून वाचली.त्यामध्ये डॉ. ए. पी. जे.अब्दुल कलाम ,साने गुरुजी,महात्मा फुले, सुनिल गावसकर, श्यामची आई, अकबर बिरबल यांच्या गोष्टी, वि.दा.सावरकर,शालेय विचार,आरोग्य, मिरा बोरवणकर,कविता अशी विविध पुस्तके आज विद्यार्थ्यांनी वाचली.शाळेच्या ग्रंथपाल श्रीमती. कोळेश्वर् यांनी विद्यार्थ्यांना पुस्तकांचे संच वाचायला दिले. यावेळी विद्यार्थ्यांनी मनोगत ही व्यक्त केले.विद्यार्थी रोज पुस्तके वाचतात,मात्र अवांतर पुस्तके वाचली पाहिजे त्यामुळे आपल्याला प्रेरणा मिळते असे शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती.मिनाक्षी कुलकर्णी यांनी सांगितले. यावेळी शिक्षक संदीप इंगोले, मदन सोजे,भीमाशंकर कुलकर्णी, राजाराम साबळे, अलकनंदा गाडेकर,प्रगती भालेकर उपस्थित होते.

# अरीबा शेख राज्यात दूसरी, मान्यवरांच्या हस्ते सन्मान

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** जालना येथील १०० शिक्षक क्लबच्या वतीने उन्हाळी सुट्टीत शालेय विद्यार्थ्यांना नातेसंबंधांची ओळख व्हावी आणि नातेसंबंधांवर स्वतः चे मत व्यक्त करता यावे यासाठी पहिली ते नववी च्या विद्यार्थ्यांसाठी राज्य स्तरीय ऑनलाईन ओळख नातेसंबंधांची वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली होती. यात सेठ एकनाथ भगवानदास काबरा उर्दू विद्यालय टेंभुर्णी ची इयत्ता आठवी ची विद्यार्थिनी अरीबा साबेरोद्दीन शेख हिने राज्यात दूसरा क्रमांक मिळविला होता. तिच्या या यशाबद्दल यशवंत राव चव्हाण सभागृह ज़िला परिषद येथे भव्य बक्षीस वितरण कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते सम्मानचिन्ह प्रमाणपत्र व रोख बक्षीस देऊन सम्मानित करण्यात आले. सम्मान श्री महेश शिक्षण संस्थे चे अध्यक्ष देवराव देशमुख, उपाध्यक्ष लक्ष्मण शिंदे, सचिव नंदलाल काबरा, कोषाध्यक्ष प्रेमसुख काबरा, संचालक प्रा. दत्तात्रेय देशमुख ठमाजी भागवत, मुख्याध्यापिका सुमैय्या शेख, मुख्याध्यापक सुरुशे, प्राथमिक चे मुख्याध्यापक ज्ञानेश चव्हाण, मुख्याध्यापक शेख गयास, तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी तिचे अभिनंदन केले व पुढील वाटचालिस शुभेच्छा दिल्या.


# टेंभुर्णी माहेश्वरी समाजाच्या वतीने बज बारसची पूजा संपन्न

**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** येथील माहेश्वरी समाजाच्या वतीने बज बारस हा सण मोठ्या उत्सवाने पार पडला. या वेळी गो माता, गाय आणि बछडा यांची पूजा करून नुकतेच झालेल्या तिज या सणात केलेले गोड पदार्थ त्यांना खाऊ घालतात व त्यांची पूजा करण्याची पद्धत आहे. सोबत आज महिला वर्ग उपवास करून प्रतेकाच्या घरात बाजरीची भाकर आणि मटकी भाजी करण्याची ही पद्धत आहे. या वेळी समाजाच्या वतीने सगळ्या महिला वर्ग एकत्र येऊन गाय आणि पिलाची पूजा करतात. या छोट्या छोट्या सणा निमित्त एकत्र येऊन विचाराची देवाण घेवाण करून सुख दुःख आपसात बोलतात हे महत्वाचे आहे. या वेळी सौ कांताबाई बांगड, सौ ताराबाई सोमाणी,

शकुंतला काबरा, सौ मंजुषा काबरा, सौ सूरजकवर काबरा सौ शोभा काबरा, सौ वीणा काबरा, सौ उज्वला सोमाणी, सौ सुरेखा काबरा, सौ सूनीता जांगीड सौ सरला सोमाणी, सौ मंजू काबरा, सौ संगीता अग्रवाल, सौ चांदणी जांगीड, सौ अंकिता काबरा, सौ पायल जांगीड, कू स्वस्ती काबरा हे आदी या वेळी उपस्थित होते.

# हरिराम तिवारी यांना बंधूशोक

**मंठा । प्रतिनिधी -** येथील ज्येष्ठ पत्रकार हरिराम तिवारी (बाबूजी तिवारी) यांचे धाकटे बंधू रमेशचंद्र रामप्रसादजी तिवारी यांचे दिनांक ३० ऑगस्ट २०२४ शुक्रवार रोजी वयाच्या ७८ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले, रमेशचंद्र तिवारी हे अत्यंत धार्मिक, आध्यात्मिक, व बोलक्या स्वभावाचे म्हणून सर्व सुपरिचीत होते, त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, तीन मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार असून त्यांच्या अंत्यविधीत शहरातील सर्व स्तरातील लोकांची उपस्थिती होती. मालेगांव जि वाशिम येथील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.





**महाराष्ट्रत महाविकास आघाडी कडून होत असलेले गलिच्छ राजकारण व राज्याचं वातावरण गढूळ करण्याच्या दृष्टिकोनातून केल्याजणाऱ्या आंदोलनाला प्रतिउत्तर म्हणून महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या समोर रविवार (दि १) रोजी जालना जिल्ह्यातील सर्व युवा मोर्चा पदाधिकारी व भाजपा पदाधिकारी यांच्यावतीने महाविकास आघाडीच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात आले आहे. यावेळी जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे, भाजपा जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, जालना महानगराध्यक्ष अशोक पांगारकर, सिध्दीविनायक मुळे, भागवत बावणे, अमोल धानुरे, कपील दहेकर, मुकेश चव्हाण, इम्रान सय्यद, प्रमोद गंडाळ, विजय मोहिते, कृष्णा चव्हाण, सुमित सुरडकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

# जेपीसी बँकेच्या प्रभारी अध्यक्षपदी संजय भरतीया



**जालना । प्रतिनिधी -** दि जालना पिपल्स को- ऑप बँकेच्या प्रभारी अध्यक्षपदी दैनिक कृष्णनितीचे संपादक संजय कैलासंचद्र भरतीया यांची निवड करण्यात आली आहे.

विद्यमान अध्यक्ष संजय मुथा हे रजेवर गेले असल्यामुळे त्यांच्या अध्यक्षपदाचा प्रभारी पद्भार संजय भरतीया यांना देण्यात आला आहे. यावेळी अध्यक्ष संजय मुथा, जेष्ठ संचालक सतिश पंच, राजकुमार दायमा, किशोर देविदान उपस्थित होते.

# वृत्तपत्र लेखकांची चळवळ जोमाने सुरु ठेवावी

## मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांची अपेक्षा

**मुंबई । प्रतिनिधी -** महाराष्ट्राच्या इतिहासात सीमा लढा असो, की स्थानिक चळवळी, त्यात वृत्तपत्र लेखकांनी जनमत घडविण्याचे अनमोल कार्य केले आहे. आज समाज माध्यमे कितीही प्रबळ झाली असली, तरी विश्वासार्हता टिकविण्याचे काम हे वृत्तपत्र लेखकांकडूनच होत आहे. त्यामुळे जनतेचे प्रांजळ विचार मनामनात पोहोचवणारी वृत्तपत्र लेखकांची चळवळ यापुढे अशीच जोमाने सुरू ठेवण्याची अपेक्षा मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांनी व्यक्त केली. दैनिक 'नवशक्ति- फ्री प्रेस जर्नल' वृत्तपत्र समूहाने आयोजित केलेल्या मराठी वृत्तपत्र लेखक संघ, मुंबईच्या 'जनमनाचा कानोसा' संमेलनाच्या अमृतमहोत्सवी सोहळ्यात ते बोलत होते.

या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे व मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात म्हणाले की, आजचा हा समारंभ अत्यंत कौटुंबिक वातावरणात साजरा होत आहे. त्यामुळे औपचारिक भाषण न करता मी मनोगत मांडणार आहे. वृत्तपत्र लेखकांच्या या चळवळीचा पाया 'नवशक्ति' आणि 'फ्री प्रेस जर्नल' तसेच त्यांच्या मालक- व्यवस्थापनाने घातला. मी आता पालिका आयुक्त पदावर असलो तरी राज्याच्या माहिती महासंचालनालयातही होतो. त्यामुळे पत्रकारितेचे क्षेत्र मी जवळून अनुभवले आहे. त्या काळात समाज माध्यमांना नुकतीच पालवी फुटू लागली होती. ती पूर्ण क्षमतेने लोकांपर्यंत पोहोचली नव्हती. अशा वेळी सर्वसामान्य लोकांसाठी वृत्तपत्रांत पत्रलेखन हेच एक अभिव्यक्तीचे मुख्य साधन होते. त्या काळात बहुतांश वर्तमानपत्रांचे याबाबत उत्तम धोरण होते. चांगल्या लेखकांच्या पत्रांना वर्तमानपत्रात योग्य स्थान दिले जात होते. सरकार आणि प्रशासनालाही जनमताचा आरसा म्हणून अशा पत्रांचा उपयोग होत असे. सध्या जिल्हा परिषदा असोत. की नगरपालिका, महापालिका असोत, तेथे महापौर, लोकनियुक्त प्रतिनिधी नाहीत. आमच्याकडे लोकांकडून येणारा फीडबॅक पूर्णपणे बंद झाला आहे. हा अपवादात्मक प्रसंग आहे. तसे पाहता लोकप्रतिनिधींकडून मिळणारा फीडबॅक हा राजकीयदृष्ट्या प्रेरित असतो. पण वृत्तपत्र लेखकांची पत्रे ही प्रांजळ असतात, असे परखड निरीक्षणही गगराणी यांनी नोंदवले.

**लेखकांची सर्जनशीलता**

गगराणी म्हणाले की, जागतिक स्तरावरचे इकॉनॉमिस्ट हे वर्तमानपत्र गेली दीडशे वर्षे प्रत्येक अंकात एक पान वाचकांच्या पत्रांसाठी देते. त्यात विविध विषयांवर गंभीर चर्चा करणारी वाचकांची पत्रे असतात आणि शेवटी एक पत्र मनोरंजनात्मक असते. त्यातून वृत्तपत्र लेखकांची सर्जनशीलता दिसून येते.

'नवशक्ति', 'फ्री प्रेस जर्नल' यांनी जोपासलेली ही वृत्तपत्र लेखकांची चळवळ आहे. वाचकांच्या पत्रांमधून खरेतर लोकांच्या मनात काय चालले आहे, याची नाडीपरीक्षा होते. लोकांचे विचार पोहोचवणारी ही चळवळ अशीच चालू राहो यासाठी माझ्या शुभेच्छा आणि माझे ते तुम्हाला आवाहन आहे असेही समजा, असे मनोगत भूषण स गगराणी यांनी व्यक्त केले.

मराठी वृत्तपत्र लेखक संघाच्या जमका संमेलनाचा ७५ वा वर्धापनदिन सोहळा 'नवशक्ति- फ्री प्रेस जर्नल'च्या प्रांगणात शनिवारी मोठ्या उत्साहात व दणक्यात साजरा झाला. 'नवशक्ति' चे कार्यकारी संपादक प्रकाश सावंत यांनी उपस्थितांचे स्वागत केले. तसेच, त्यांच्याच हस्ते गगराणी यांना शाल, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. संघाचे कोषाध्यक्ष आत्माराम गायकवाड यांच्या हस्ते पत्रकार हर्डीकर यांना सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. 'नवशक्ति फ्री प्रेस जर्नल'चे व्यवस्थापकीय संचालक अशोक कर्नानी यांना मराठी वृत्तपत्र लेखक संघाच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. 'नवशक्ति फ्री प्रेस जर्नल'चे व्यवस्थापकीय संचालक अशोक कर्नानी यांना मराठी वृत्तपत्र लेखक संघाच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी ज्येष्ठ वृत्तपत्र लेखक रमेश सांगळे यांना वृत्तपत्र लेखक चळवळीसाठी योगदान दिल्याबद्दल जीवनगौरव देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. मराठी वृत्तपत्र लेखक संघाचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे यांनी प्रास्ताविक केले.




संघाचे माजी अध्यक्ष प्रकाश नागणे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. संघाचे प्रमुख कार्यवाह प्रशांत घाडीगावकर यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमाला राज्यभरातून अनेक ज्येष्ठ वृत्तपत्र लेखक आवर्जुन उपस्थित होते.

संघाचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे आपल्या प्रास्ताविकात म्हणाले की, आजचा दिवस आपल्यासाठी अत्यंत आनंद आणि उत्साहाचा आहे. वृत्तपत्र लेखकांवर खरे तर हे 'नवशक्ति'चे उपकार आहेत. त्या काळात आणि आजही 'नवशक्ति'ने आपले आमच्यावर कायम ठेवले आहे. त्यावेळी तांबे उपहारगृहात 'नवशक्ति'चे मालक सदानंद यांच्या पुढाकाराने झालेल्या जमका संमेलनाला दोनशे पत्रलेखक हजर होते, याची आठवण त्यांनी करून दिली. वृत्तपत्र लेखकांच्या या चळवळीचा श्रीगणेशा नवशक्तिमुळेच झाला पुढे समाजातील विविध मान्यवरांनी संस्थेच्या व्यासपीठावर येत चळवळ जिवंत ठेवली आहे. ज्याची पुढची वाटचाल अशीच अनेक शंभर वर्षे चालणार आहे. असा संकलपयुक्त आशावाद त्यांनी व्यक्त केला.संघाचे विद्यमान अध्यक्ष रवींद्र मालुसरे यांनी पहिल्या जमका संमेलनाची आठवण जागवताना सांगितले की, त्या दिवशी झालेल्या संमेलनाच्या बातमीचे हेडिंग होते... 'आइस्क्रीमपेक्षा चर्चा भारी' झाली. कारण काय, तर संमेलन मोठ्या झोकात पार पडले होते. त्यावेळी ज. द. शिंदे यांनी स्वखर्चाने 'सर्व उपस्थितांना आइस्क्रीम दिले होते. यावेळी चितळे उद्योग समूहाचे (पुणे) व्यवस्थापक राहुल जोगळेकर यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

# करिअरच्या वेगवेगळ्या संधी उपलब्ध

## सहायक पोलिस निरीक्षक सचिन खामगळ यांचे प्रतिपादन

**टेंभुर्णी -** स्पर्धा परी- क्षेच्या माध्यमातून करिअरच्या वेगवेगळ्या संधी उपलब्ध आहेत. आपण त्याकडे वळायला हवे तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना पोक्सो कायदा, बाल सुरक्षा कायदा याविषयी माहिती जाणून घ्यावी असे आवाहन सहायक पोलिस निरीक्षक सचिन खामगळ यांनी केले आहे.


जाफराबाद तालुक्यातील देवळे-गव्हाण येथील जय भवानी विद्यामंदिर येथे विद्यार्थ्यांना कायदेविषयक व करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ यांनी विद्यार्थ्यांनी शालेय

जीवनामध्ये अभ्यास, शिस्त व करिअरवर फोकस करण्याचे सांगितले. याप्रसंगी प्राचार्य ज्ञानेश्वर निकम, पोलीस गजेंद्र भुतेकर, जेष्ठ शिक्षक कौतिकराव पिंपळे, रामेश्वर शेवाळे, राजू गोफणे, प्रा डॉ मनोरमा राठोड, मिरा निकम, प्रा सारिका पडघान, सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

### माजीमंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या प्रयत्नाला यश

# २०२३ चा खरीप हंगामातील परतूर-मंठ्याचे रखडलेले ४२ कोटी रु अनुदान मिळणार

**परतूर । प्रतिनिधी -** सन २०२३ च्या खरीप हंगामातील पीक पाहणी दरम्यान पावसाचा १९ दिवसांचा खंड पडल्यामुळे पिक विमा कंपनीने कापूस व सोयाबीन या पिकांचा पीक विमा नाकारला होत त्यासाठी २२ दिवसाचा खंड पडणे आवश्यक असल्याचा निकष कंपनीने सांगितला होता यासाठी म ाजीमंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्राद्वारे तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेऊन जालना जिल्ह्यातील पिक विमा संदर्भात चर्चा केली होती. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार आम दार लोणीकर व जिल्हाधिकारी यांनी कृषी विभागाची बैठक घेऊन शासन व पिक विमा कंपनीला करपलेली पिके व त्याचा उत्पन्नावर झालेला परिणाम या संदर्भातील आकडेवारी व विमा देणे किती आवश्यक आहे या संदर्भातील सर्व आवश्यक बाबींची पूर्तता करणे संदर्भात अहवाल पाठवला होता त्यानुसार केवळ २५ टक्के अग्रीम रक्कम मिळाली होती तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या सरकारने पीक विमा कंपन्यांशी केलेल्या करारानुसार जेवढी उत्पन्नामध्ये घट कंपनीला हवी होती तेवढी झाली नाही या कारणापोटी पीक विमा नाकारण्यात आला होता त्यात बदल करण्यासंदर्भात माजीमंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी या बाबीचा सातत्याने पाठपुरावा करून संपूर्ण जिल्ह्यासाठीचा हा पिक विमा मंजूर करून घेतला आहे यापूर्वी जालना जिल्ह्यातील केवळ ८ मंडळांचा यामध्ये समावेश करण्यात आला होता उर्वरित म हसूल मंडळे मात्र वगळण्यात आली होती अशी माहिती माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली



राज्यातील सन २०२३ च्या खरीप हंगामातील ई पीक पाहणीवरील नोंदीत कापूस व सोयाबीन व उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य मंजूर करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. परतुर तालुक्यासाठी कापूस पीकासाठी ९ कोटी १४ लाख व सोयाबीन पीकासाठी १२ कोटी १० लाख असे एकुण २१ कोटी १४ लाख अनुदान मिळणार आहे.तर मंठा तालुक्यासाठी कापूस पीकासाठी ७ कोटी ८७ लाख व 'सोयाबीन पीकासाठी १८ कोटी ७० लाख असे एकुण २६ कोटी ५७ लाख अनुदान मिळणार आहे.

परतुर तालुक्यातील लाभ मिळणारे कापूस क्षेत्र व शेतकरी संख्या विचारात घेता वैयक्तिक खातेदार कापूस ई पीक पाहणी क्षेत्र १७०२७ हेक्टर इतके असून शेतकरी संख्या २२९०३ इतकी आहे त्याचप्रमाणे सामायिक खातेदार कापूस ई पीक पाहणी क्षेत्र ३३०१ हेक्टर असून शेतकरी संख्या ३७९९ इतकी आहे. परतूर तालुक्यातील कापसाचे एकुण क्षेत्र २०३२८ हेक्टर असून एकूण शेतकरी संख्या २६७०२ इतकी आहे. तर मंठा तालुक्यातील वैयक्तिक खातेदार कापूस ई पीक पाहणी क्षेत्र १३३४३ हेक्टर असून शेतकरी संख्या ५६३९ इतकी आहे. सामायिक खातेदार कापूस ई पीक पाहणी क्षेत्र ४१६२ हेक्टर असून कापसाचे एकूण क्षेत्र १७५०५ हेक्टर आहे त्यामध्ये २७७७८ शेतकऱ्यांचा समावेश आहे

परतुर तालुक्यातील लाभ मिळणारे सोयाबीन पिकाचे वैयक्तिक खातेदार सोयाबीन ई पीक पाहणी क्षेत्र २२९६७ हेक्टर असून शेतकरी संख्या २६६३८ इतकी आहे. सामायिक खातेदार सोयाबीन ई पीक पाहणी क्षेत्र ३९३९ असून त्याची शेतकरी संख्या ३९७३ इतकी आहे. परतूर तालुक्यात सोयाबीनचे एकूण क्षेत्र २६९०६ हेक्टर असून ३०६११ इतकी शेतकरी संख्या आहे. तर मंठा तालुक्यातील लाभ मिळणारे वैयक्तिक खातेदार सोयाबीन ई पीक पाहणी क्षेत्र ३१५०३ हेक्टर असून ३८८२५ इतकी शेतकरी संख्या आहे. सामायिक खातेदार सोयाबीन ई पीक पाहणी क्षेत्र १००६२ हेक्टर असून शेतकरी संख्या १०४४२ इतकी आहे. मंठा तालुक्यातील सोयाबीन एकुण क्षेत्र ४१५६५ हेक्टर असून ४९२६७ शेतकरी संख्या आहे.

एका शेतकऱ्यासाठी अनुदान मर्यादा सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ०.२ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्रासाठी सरसकट रु.१००० तर ०.२ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रासाठी त्यांच्या क्षेत्रानुसार प्रति हेक्टर रु.५००० (२ हेक्टर मर्यादेत रु.१००००) अर्थ सहाय्य मंजुर करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. या अनुदानाचे वितरण शेतकऱ्यांना सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीद्वारे शेतकऱ्यांच्या आधार लिंक बँक खात्यामध्ये थेट लाभ हस्तांतरणांच्या (उद्दढ) माध्यम ातून होणार आहे. त्यानुषंगाने अनुज्ञेय अनुदाने शेतकऱ्यांना देण्यासाठी शेतकऱ्यांच्या आधार संबंधी माहितीचा वापर करण्याबाबत त्यांच्याकडुन घेण्यात येणाऱ्या संमती पत्र तसेच सामायिक खातेदारांच्या बाबतीत एकाच खातेदारास अर्थसहाय्य वितरीत करण्याच्या अनुषंगाने घ्यावयाच्या ना हरकत पत्र कृषि सहाय्यकाकडे आधार कार्ड जोडून दि. १९ ऑगस्ट पुर्वी देणेबाबत सूचना करण्यात आली होती.

कृषि विभागामार्फत क्षेत्रीय स्तरावर पात्र असलेल्या शेतकऱ्यांकडून संमती पत्र, ना हरकत पत्र स्वीकारण्याचे काम प्रगतीपथावर सुरु आहे. संमती पत्र व ना हरकत पत्र नमूना आपल्या गावाच्या कृषि सहाय्यकाकडे उपलब्ध आहे. सदर योजना फक्त सन २०२३ च्या खरीप हंगामातील ज्या शेतकऱ्यांनी ई पीक पाहणी केलेली आहे फक्त अशाच कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान मिळेल. कापुस उत्पादक २७५३९१ शेतक-यांना सदर योजने अंतर्गत लाभ दिला जाणार आहे. सोयाबीन उत्पादक ३४५०३० शेतक-यांना सदर योजने अंतर्गत लाभ दिला जाणार आहे. जालना जिल्ह्यातील एकुण ६२०४२१ पात्र शेतक-यांना सदर योजनेचा लाभ दिला जाणार आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.